महाराष्ट्र शासन
उपवनसंरक्षक,पुणे वन विभाग,पुणे
सेनापती बापट मार्ग, पुणे 411 004

दूरध्वनी – 020 25660593 ई-मेल – dycfpune@gmail.com

क्रमांक-अ/कक्ष-4-2/जमीन/ 659 /2022-23, दिनांक - 24 / 02 / 2023.
पत्र .
प्रति,

मा.मुख्य वनसंरक्षक,(प्रा.),
पुणे.

**विषय:**- राज्यमार्ग क्रं.121, निरा-बारामती (कि.मी. 63/00 ते 63/894) या रस्त्याच्या कामासाठी मौजे-पणदरे, ता.बारामती, जि.पुणे येथील 0.379 हे. वनजमीन वळती करणेबाबत.(FP/MH/Road/152323/2022)

संदर्भ-1) शासन पत्र क्रं.FLD-1922/CR.25/F-10, दि.06.02.2023.
2) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,नागपूर यांचेकडील पत्र क्रं.कक्ष-17/नोडल/पुणे/आयडी-13651/24/3005, दि.08.02.2023.
3) आपणाकडील पत्र क्रं.कक्ष-4/4(2)/जमीन/प्रस्ताव-372/2022-23/693, दि.10.02.2023.
4) वनपरिक्षेत्र अधिकारी,बारामती यांचेकडील पत्र क्रं.जमीन/1658/2022.23,दि.23.02.2023.

विषयांकित प्रस्ताव शासनास सादर केला असता सदर प्रस्तावामध्ये संदर्भ क्रं.1 च्या शासन पत्रान्वये काही मुद्दे उपस्थित केले असून सदर पत्राची प्रत संदर्भिय पत्र क्रं.3 अन्वये या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. उपरोक्त संदर्भ क्रं.1 अन्वये शासन पत्रान्वये उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांच्याा अनुषंगाने माहिती खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ. क्र. | उपस्थित मुद्दा | सादर करावयाची माहिती |
|---|---|---|
| 1 | स्थळ पाहणी अहवालामध्ये मौजे वाल्हे येथील पाण्याची टाकी व पाईपलाईनचे काम असल्याचे नमूद केले आहे. परंतू, सदर प्रस्ताव हा राज्यमार्ग क्रं.121, निरा-बारामती(कि.मी.63/00 ते 63/894) या रस्त्याच्या कामासाठी मौजे-पणदरे, येथील जमीन वळतीकरणासाठी प्रस्तावित आहे. सबब, त्याप्रमाणे सुधारीत स्थळ पाहणी अहवाल सादर करावा. | राज्यमार्ग क्रं.121, निरा-बारामती(कि.मी.63/00 ते 63/894) या रस्त्याच्या कामासाठी मौजे-पणदरे, येथील जमीन वळतीकरणासाठी प्रस्तावित आहे. सबब, त्याप्रमाणे सुधारीत स्थळ पाहणी अहवाल सोबत जोडला असे. Annexure-I (3 प्रतीत) |
| 2 | शेती सिंचनासाठी भूमीगत पाण्याच्या पाईपलाईन टाकण्यासाठी मौजे. पणदरे येथील 0.028 हे. वनजमीन वळतीकरणाच्या अनुषंगाने पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे साबळेवाडी, ता.बारामती, जि.पुणे येथील गट नं.143 मधील 0.10 हे. अवनत वनजमिनीची KML File सादर केली असल्याचे दिसून येते. त्यामुळे सुधारीत KML File सादर करावी. | राज्यमार्ग क्रं.121, निरा-बारामती(कि.मी.63/00 ते 63/894) या रस्त्याच्या कामासाठी मौजे-पणदरे, येथील जमीन वळतीकरणाच्या अनुषंगाने पर्यायी वनिकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे साबळेवाडी, ता.बारामती, जि.पुणे येथील गट नं.143 मधील 0.40 हे. अवनत वनजमिनीची सुधारीत KML File सोबत सादर केली असे. Annexure-II (3 प्रतीत) |
| 3 | KML File चे अवलोकन केले असता, मौजे साबळेवाडी, ता.बारामती, जि.पुणे येथील गट नं.143 | वन परिक्षेत्र अधिकारी, बारामती यांचेकडील पत्र क्रं.1658,दि.23.02.2023अन्वये प्राप्त अहवालानूसार |

| | | |
|---|---|---|
| | मधील वनक्षेत्रात काही जमिन वहितीखाली तर काही क्षेत्रावर बांधकाम झाले असल्याचे दिसून येते. सबब,सदर क्षेत्रावर अतिक्रमण झाले आहे किंवा कसे, याबाबत अधिक माहिती सादर करण्यात यावी. | मौजे साबळेवाडी, ता.बारामती जि.पुणे येथील राखीव वन गट नं.143 चे एकूण क्षेत्र 16.48 हे.आर असून त्यापैकी, त्यापैकी 8.48 हे.आर क्षेत्र वनविभागाचे ताब्यात आहे व 7.60 हे.आर क्षेत्र महसूल विभागाकडून केलेले वाटप क्षेत्र आहे. वनविभागाच्या ताब्यात असलेल्या वनक्षेत्रावरती अतिक्रमण झालेले नाही. |
| 4 | पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावित केलेल्या मौजे साबळेवाडी, ता.बारामती, जि.पुणे.येथील गट नं.143 चा 7/12 सादर करावा. | पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावित केलेल्या मौजे साबळेवाडी, ता.बारामती, जि.पुणे.येथील गट नं.143 चा 7/12 सोबत सादर करण्यात येत आहे. Annexure-III (3 प्रतीत) |

सोबत – वरीलप्रमाणे 3 प्रतीत.

(राहुल पाटील,भा.व.से.)
उपवनसंरक्षक,
पुणे वनविभाग,पुणे.

प्रत- सहा.वनसंरक्षक(सांख्यिकी)पुणे यांचेकडे वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहिसाठी अग्रेषित.

प्रत- अमोल अ.पवार, सहाय्यक अभियंता (श्रेणी), सा.बां.उपविभाग,बारामती यांचेकडे वरीलप्रमाणे माहितीसाठी.

प्रत- वनपरिक्षेत्र अधिकारी,बारामती यांचेकडे वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहिसाठी.